पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण
पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक - पिन 422003
दुरध्वनी नंबर 0253-2309700
E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेस नोट** दिनांक :- १०/०९/२०२४

## अवैध मद्य तस्करीतुन झालेल्या हत्येच्या गुन्हयातील क्रेटा कारमधुन तस्करी करणारे मुख्य सुत्रधारास स्थानिक गुन्हे शाखेने दमण येथून केली अटक

---

दिनांक ०७/०७/२०२४ रोजी रात्रीचे सुमारास चांदवड-मनमाड रोडवर अवैधरित्या मद्यसाठयाची वाहतुक करणा-या कारने राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या स्कॉर्पिओला दिलेल्या धडकेत राज्य उत्पादन शुल्क नाशिक विभागाचे जवान जागीच ठार झाले होते. या घटनेत लासलगाव पोलीस ठाण्याचे दोन पोलीस अंमलदार देखील गंभीर जखमी झाले होते. सदरच्या घटने बाबत चांदवड पोलीस ठाणे येथे गु.र. नं. २७३/२०२४ भारतीय न्याय संहीता कलम १०३(१), १०९, १३२, २३८, ३२४(४), १२१ (१), (२), ३(५), ६१(२) सह मोटर वाहन का. क. १८३, १८४, १३४(अ),(ब)/१७७, ७९(१), ६१ (२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर प्रकरणी नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने यांनी तात्काळ दखल घेवून यातील गुन्हेगारांना तातडीने अटक करणेकामी जिल्हयात व परराज्यात पथके रवाना केली होती. त्यानुसार पोलीस पथकांनी सदर गुन्हयात आरोपी नामे १) देवीश पटेल, २) अशपाक अली शेख, ३) राहुल सहाणी, ४) शोहेब अन्सारी, ५) भावेशकुमार प्रजापती या पाच आरोपींना अटक करून सदरचा गुन्हा उघडकीस आणलेला आहे. सदर गुन्हयातील उर्वरित आरोपींचे शोधार्थ स्थानिक गुन्हे शाखेचे पथकास रवाना करण्यात आले होते. त्याप्रमाणे पथकातील अंमलदार यांनी दमण-दादरनगर हवेली याठिकाणी सतत पाळत ठेवून मिळविलेल्या गुप्त माहितीचे आधारे सदर प्रकरणातील **गुन्हयाचे दिवशी मद्याची अवैधरित्या वाहतुक करणा-या वाहनांच्या ताफ्यात सामील असलेला क्रेटा कारमधील मुख्य सुत्रधार** व परराज्यातुन महाराष्ट्र राज्यात मद्याची तस्करी करणारा आरोपी नामे **६) संजय मारवाडी उर्फ पुरणसिंग माधुसिंग मारवाडी,** वय ३३, रा. रिंगनवाडा, चक्काभाईची चाळ, डीमार्ट समोर, दमण, मुळ रा. नौसारा, जि.जालोड, राजस्थान यास दमण येथुन शिताफिने ताब्यात घेतले. सदर आरोपी हा घटनेच्या दिवशी यातील मुख्य क्रेटा कारमध्ये मद्यसाठा घेवुन अवैधतरित्या वाहतुक करत होता, त्यास गाडी थांबविण्याचा इशारा केला असता, तो पोलीसांना हुलकावणी देवुन फरार झाला होता. सदर आरोपीस वरील गुन्हयात अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास वरिष्ठांचे मार्गदर्शनानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे यांचे पथक करीत आहे. जिल्हयाचे सीमावर्ती भागातून होणारे अवैध मद्य तस्करीचे पाळेमुळे नष्ट करण्यासाठी नाशिक ग्रामीण पोलीस दलातर्फे सत्वर कारवाई करण्यात येत आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री.विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक श्री. आदित्य मिरखेलकर, अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. अनिकेत भारती यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि/राजु सुर्वे, पोहवा सचिन देसले, किशोर खराटे, धनंजय शिलावटे, प्रकाश कासार, मेघराज जाधव, नितीन डावखर, मनोज सानप तसेच तांत्रिक विश्लेषन विभागाचे पोना प्रदिप बहिरम, हेमंत गिलबिले यांचे पथकाने कामगिरी केलेली आहे.